# प्रकरण तिसरे

# समकालीन कथालेखक आणि समकालीन कथालेखनातील आप्पासाहेब खोत यांच्या कथालेखनाचे पृथकत्व

# प्रकरण ३

**समकालीन कथा लेखक आणि समकालीन कथालेखनातील आप्पासाहेब खोत यांच्या कथालेखनाचे पृथकत्व –**

आप्पासाहेब खोतांच्या समकालीन कथालेखकांचा विचार करता त्यांच्या कथाविश्वाचा वेगळा आविष्कार चटकन लक्षात येतो. वास्तविक चौथ्या पिढीतील ग्रामीण कथा लेखकानी मराठी कथाविश्वात आपले अनुभव बदलत्या जाणीव नेणीवासह अभिव्यक्त केले आहेत. १९८० नंतरच्या सामाजिक, सांस्कृतिक बदलाचा परिणाम ग्रामजीवनात राहणाऱ्या या लेखकाच्या जीवनावर झाल्याचे दिसते आणि त्या त्या काळात, प्रदेशात ग्राम खेड्यात राहणाऱ्या लेखकाचे जीवन परिपूर्णरित्या ढवळून निघाले होते. ही पिढी या प्रस्थापित व्यवस्थेला प्रामुख्याने सामोरी गेली आहे आणि त्याच अनुभवसंचितातून त्यांनी साहित्यकृती निर्मितीचा ध्यास घेतला गेल्याचे दिसते. परंतु ग्रामीण लेखकापुढे आपल्या परंपरेने ग्राम जीवनाचे कसे वास्तव चित्रण केले याचे भानही त्यांनी राखल्याचे दिसते. सामाजिक वास्तवतेचे विदारक दर्शन घडविण्यात आणि आर्थिक, राजकिय परिणामाचे रूपस्वरूप चित्रित करण्यात ग्रामीण कथा पुढचा एक टप्पा पूर्ण करते आहे असे वाटत राहते. खेडे ही कल्पना भौतिक प्रगतीबरोबर ग्रामीण माणसात बदलणाऱ्या मानसिक स्थिती-गतीचे चित्रण प्रामुख्याने कथालेखकानी टपलेले दिसते. ग्रामीण माणूस आणि त्याचे जीवन चित्रण करण्यात या पिढीतील लेखकांनी अधिक भर दिल्याचे दिसते. तिसऱ्या पिढीतील लेखकांनी जाणीवेच्या पातळी पूर्व ग्रामीण साहित्याचे अनुकरण केल्याचे दिसते. त्याच्या साहित्य कृतीतून तोच तो आविष्कार होत राहिल्याचे जाणवते. परंतु या पिढीतील लेखकांनी हे सर्व झुगारून दिल्याचे दिसते. कलात्मकदृष्ट्या ही संपन्न असणारी आजची ग्रामीण कथा वेगवेगळ्या प्रदेशात त्या त्या लेखकानी आविष्कार संपन्न बनवली आहे. प्रतिमा

इंगोले, बाबाराव मुसळे, सदानंद देशमुख, आप्पासाहेब खोत हे आज ही आघाडीवर असलेले लेखक आहेत. बदलत्या ग्रामीण खेड्याच्या व्यथा आणि वेदना या लेखकानी अतिशय संवेदनशीलतेने टिपलेल्या आहेत, परंतु आशय आणि अभिव्यक्तीच्या बाबतीत त्याचे वेगवेगळे स्वरूप जाणवते. प्रत्येकाची कथेची धाटणी वेगळी आहे परंतु ग्रामीण माणसाचं नातं सांगणारी ग्रामीण संस्कृतीचं वास्तव विदारक दर्शन घडणारी अनुभव संपन्न कथा निर्माण झाल्याचे दिसते. तिचा नेमका परिणाम असा झाला की, आजच्या मराठी साहित्य प्रवाहात ग्रामीण कथाविश्वाला एक मूलभूत अधिष्ठान प्राप्त झालेले आहे यात शंका नाही. शिवाय अनुभूतीतील ताजेपणा आणि अभिव्यक्तीतील चैतन्य यामुळे ती लक्षवेधी ठरली आहे. चौथ्या पिढीतील ग्रामीण कथालेखक म्हणून प्रामुख्याने नामदेव माळी, प्रतिमा इंगोले, बाबाराव मुसळे, सदानंद देशमुख, आप्पासाहेब खोत, आनंदराव पाटील इ. यातील नामदेव माळी पश्चिम महाराष्ट्रातील सांगली, तासगांव, विसापूर, या परिसरात वास्तव्य करणाऱ्या या लेखकाने अतिशय संवेदनशीलतेने आपले अनुभवविश्व कथा वाङमय प्रकारात प्रकट केल्याचे दिसते. बदलत्या खेड्याचे रूप त्यातील विसंगती त्यांनी टिपली आहे. ग्रामीण भागात यंत्रयुग अवतरले. दळणवळणाची साधने वाढली परंतु त्याचबरोबर या नव्या सुधारणांनी परंपरागत ग्रामव्यवस्थेला हादरे बसू लगले. राजकारणाने खेड्यात प्रवेश केला आणि ग्रामपातळीवरची गावगाड्यातील एकसंध ग्राम व्यवस्थाच कोलमडून पडली. शिवाय गाडग्यातल्या मिठालाही महाग झालेल्या दु:खाच्या चरकात पिळवटून निघणाऱ्या तरीही मातीशी इमान राखणाऱ्या शेतकऱ्यांची , कष्टकऱ्यांची व्यथा घेऊन उभी राहिलेली माळी यांची कथा वाचकाला अंतर्मुख करते यात वाद नाही. त्यांचा 'आभाळदानी' हा कथासंग्रह वैशिष्ट्यपूर्ण आहे. या संग्रहात एकूण १३ कथा समाविष्ट केलेल्या आहेत. 'कोंबडी' ही पहिलीच कथा ग्रामीण भागात गरिबाच्या मुंड्या मुरगाळून आणि अन्याय, अत्याचार करून शोषण करणारे पाटील अन् त्यांची चांडाळचौकडी यांच्या विरोधात अखेर बंड करून उठणारा हऱ्या लेखकाने शब्दबध्द केला आहे. तर खेड्यातील अंधश्रध्देवर प्रकाश 'पान्हा' 'हाडळ' या कथेत टाकला आहे. 'तारा' या स्त्रीच्या दु:खाची परवड 'इस्कोट' मध्ये आली आहे. व्यसनी, दारूड्या नवऱ्याबरोबर संसार करताना अन् बुध्दीने मंद असलेल्या एकुलत्या एक म्हादाला सांभाळताना रोजच्या जगण्यासाठी करावी लागणारी यातायात लेखकाने नेमकेपणाने शब्दबध्द केली आहे.

आईवडीलांच्या माघारी माहेरची वाट बंद होते. भाऊ-भावजय बोलत नाहीत. चहापान करत नाहीत. आपले माहेर सत्येचे असूनही आई-वडिलांनंतर तेथे भिकारणीची वागणूक मिळालेल्या ताराचे शेत फुलवण्याचे स्वप्न जेव्हा भंग पावते तेव्हा ती गळफास लावून घेऊन आत्महत्त्या करते. क्षणाक्षणाला उत्कंठा वाढविणारी, अखेर कारूण्यात घेऊन जाणारी ही कथा लेखकाच्या निवेदनशैलीने अधिकच परिणामकारक झाली आहे. 'फासच लाऊन घ्यावा, जराशी धडपड झाली, नरड्याच्या घाटीला फास आवळला.. . . . खालचा जीव खाली, वरचा जीव वर . . . . . तसंच कराव.' १ व्यसनाने दारूने उभ्या संसाराची होणारी नासाडी अन् त्यातच आपल्या बायकोचा होणारा अंत या साऱ्यातून दुःखगर्भ आशय ग्रामीण जीवनाची व्यथा स्पष्ट होत राहते. 'न्याय' ही माळी यांची कथा बदलत्या माणसाच्या मनाचे, बंडखोर वृत्तीचे दर्शन घडविणारी कथा आहे. आपल्याला जोपर्यंत न्याय मिळत नाही तोपर्यंत झुंज देणारे रामोशी समाजातील माणसे अखेर गावातील टग्यांवर अन्यायी रावश्यावर चाल करतात. अन्यायी तारासह रामोशी रावशाचा कुऱ्हाडीच्या घावेने रक्तबंबाळ करतात. शिवाय न्यायासाठी नवीन बंडाला सुरूवात येथे झाल्याचे सूचित केले आहे. आजच्या ग्रामीण जीवनाच्या रंग, वास, चवीचं जीवंतपण घेऊन वावरणारं, अस्सल अनुभवविश्वाच्या आधारे कष्टकरी शेतकरी, शेतमजूर कायम दुष्काळी वातावरणात होरपळलेल्या बेरोजगार तरूण तापल्या तव्यावरच्या लाह्यासारखी तडफडणारी ग्रामीण स्त्री, दावं, खुंट्याशी झट्या घेणारी उपाशी जनावरं आणि अशा भकास वातावरणातही काळजातली प्रिती, नीती संस्काराची हिरवळ, जपू पाहणारी माळावरची माणुसकी कमालीच्या अस्वस्थपणे कारूण्यगर्भ शैलीत नामदेव माळी कथा वाचकासमोर उभी करतात. शिवाय अनुभवातील सखोलपणा नेमकेपणाने व्यक्त करताना घटना प्रसंगानुरूप कमालीची उंची साधली जाते. परंतु पुढे लेखकाने आपली लेखणी जवळजवळ थांबवली आहे.

'अकसिदीचे दाने' कथेतील पाटलीन, 'सर्वा'मधील कांता आणि 'गढी 'मधील बापू गुरूजी या व्यक्तिरेखा पाहण्यासारख्या आहेत.

इंगोल्यांच्या कथेतील व्यक्तिस्वभाव रेखाटून ग्रामव्यक्तीच्या ताण्याबाण्यास त्यांचे मनोविश्व साकारलेले आहे. 'गढी' मधील बापू गुरूजी यांनी गढीसाठी आपले संपूर्ण आयुष्य खर्ची घातले आहे. गावात शाळा सुरू करून शिक्षणाची सोय करणारे

वयाने थकलेले अन् गत आयुष्याकडे पाहताना त्यांच्या मनाची होणारी स्थिती लेखिकेने नेमक्या शब्दात टिपली आहे. घटना प्रसंगाच्या अभिव्यक्तीतून संस्काराची एकता, निवेदनातील ओघवती शैली आणि वातावरण निर्मिती या कथेमध्ये आवश्यक असलेल्या कथेची म्हणून गुणसंपन्नता स्पष्ट होते. गुरूजीचे प्रभावी व्यक्तीरेखाटन त्यांचे आदर्शवत जीवन लेखिकेने आपल्या शब्दशैलीत लेखनबध्द केले आहे.

आपल्या बहुसंख्य कथांमधून प्रतिमा इंगोले यांनी ग्रामीण स्त्रीच्या दु:खाचा वेध घेतला आहे. पण इतर ग्रामीण कथा लेखकांपेक्षा त्यांच्या स्त्री दु:खाचा पोत वेगळा आहे. स्त्रीच्या दु:खाचे चित्रण करताना तिच्या मानसिकतेबरोबर सामाजिक, कौटुंबिक घटनाकडे त्या तितकेच लक्ष देतात. स्त्रीचे मन समजून घेणारे त्या स्त्रीची काळजी घेणारे ग्रामीण पुरूष त्यांच्या कथेत आढळतात. तथापि त्या केवळ स्त्री दु:खाचे कारण म्हणून पुरूषप्रधानतेवर भर देत नाहीत तर परिस्थितीने पिचलेल्या स्त्रियांचे दु:ख त्या मांडतात. त्यांच्या कथेत आर्थिक, सामाजिक पातळीवर ग्रामीण स्त्रीची अभावग्रस्तता खणखणीतपणे व्यक्त होते. स्त्री दु:खाचे चित्रण अधिक नाट्यमय करून देण्यात इंगोले यांची कथा सरस ठरते. या दु:खाची वीण रोजच्या जगण्यातल्या छोट्या मोठ्या प्रसंगावर आधारलेली असते. परंतु कृत्रिम प्रसंग अथवा योगायोग यांचा दु:ख निर्मितीसाठी त्या कधीच आधार घेत नाहीत. निवेदनाच्या परिणामकारकतेने त्यां वाचकांना विचार करायला लावतात.

ग्रामीण स्त्रीची पतीच्या माघारी होणारी परवड त्या नेमकेपणाने 'कांता'च्या व्यक्तिरेखेतून व्यक्त करतात. शिकलेला नवरा सैन्यात दाखल होतो. त्याने कांतासाठी विमा उतरविलेला असतो. एके दिवशी तो लढता लढता मरण पावतो अन् कांताच्या जीवनाची फरपट सुरू होते. नवऱ्याच्या माघारी तिला विम्याचे पैसे मिळतात. पण ती अडाणी. तिचा अंगठा घेऊन तिच्या दिराने पैसे काढून घेतलेले असतात अन् तिला आयुष्यभर कष्ट केल्याशिवाय गत्यंतर उरत नाही. त्यातच 'निमी' एक मुलगी तिला वाढविण्याची, घडविण्याची जबाबदारी कांतावर असते. त्यासाठी ती रात्रंदिवस राब राब राबते. कष्ट उपसते. पण पोरीला त्याची जाणीव नसते. ती लहान असते. पण तिच्यावर चांगले संस्कार व्हावेत असे कांताला मनापासून वाटते. गावातील सगेसोयरे, भाऊबंध तिच्या मदतीला कोणीही येत नाहीत. तिला आयुष्यभर अश्रू गाळण्याशिवाय काहीच पदरी पडत नाही. नवऱ्याच्या माघारी तिच्या दु:खाला



14364
BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

कारण ठरलेले तिचे अडाणीपण. तिचा दीर अन् गावातील प्रमुख मंडळी यावर लेखिकीने नेकेपणाने प्रकाश टाकला आहे.

'अकसिदीचे दाने' ,या कथेत लेखिकेने ग्रामीण भागातील दुःख, दारिद्रय आणि गावातील जीवघेणा संघर्ष, हेवेदावे, डाव प्रतिडाव याचे यथार्थ चित्रण केले आहे. शिवाय एकमेकाविषयी असलेला जिव्हाळा, प्रेम याची प्रचिती आगून देणारी ही कथा. या कथेत मोरे आणि पुंडलिक पाटील या आजी-माजी सरपंच यांच्या संघर्षातून ही कथा आकाराला आली आहे. मोरे पुंडलिक पाटलांवर आगळीक करतो. त्यांना व त्यांच्या कुटुंबाला मारहाणीच्या प्रकरणात ढकलतो पण ज्यावेळी मोरेवर आपल्या मुलीच्या बाळंतपणात बाका प्रसंग येतो तेव्हा आपले वैरत्व विसरून पुंडलिक पाटील मोऱ्यांच्या मदतीला धावून येतो. तो म्हणतो, "पाटील, गावात पोरीचं समजलं अन् तसाच धावत निघालो ! टाका पोरीले टॅक्टरमंदी ! या बयलाइच्या पेडभरल्या पायानं कदीसा जान ? अवो पोरगी कायी तुमची येकल्याचीच नायी म्हनलं! आमीई अकसिदीचे चार दाने तिच्या डोस्क्यावर टाकले हायेत." २ गावगाड्यात एकमेकाविरूध्द कितीही भांडले तरी अडचणीच्यावेळी वैरीसुध्दा धावून येतो याची प्रचिती येथे येते. शिवाय ग्रामीण माणसाच्या ठिकाणी मदतीची, माणुसकीची असणारी प्रचिती पुंडलिक पाटील यांच्या व्यक्तिरेखेतून लेखिकेने अभिव्यक्त केली. खेड्यात होणारी निवडणूक, त्यानिमित्त होणारे व्यवहार यांचे चित्रण लेखिकेने केले आहे. सुमी तिचे होणारे हाल अन् खेड्यातील उपचारपध्दती यावर लेखिकेने प्रकाश टाकला आहे. अत्यंत पणिामकार रितीने २० व्या शतकातील वऱ्हाडातील खेड्याचे स्वरूप लेखिकेने शब्दबध्द केले आहे.

खेड्यातील माणूस आपल्या मुक्या प्राण्यांवर जीवापाड प्रेम करतो. आयुष्यभर राब राब राबत असताना त्यांना हे प्राणीच साथ देत असतात. 'दारका' या कथेत इंगोले यांनी नंदी- बैलाचे चित्रण अत्यंत प्रभावीपणे केले आहे. पण पोळा या दिवशी त्याची पूजा दारिद्रयामुळे, परिस्थितीच्या रेट्यात होत नाही याचं दुःख मनाला बोचत राहते. या कथेतील नायिका नंदीवर जीवापाड प्रेम करते. त्यानेही घराला घरपण दिलेले असते पण आज दिवस पालटले अन् त्या बैलाच्या सणादिवशी त्याचीच पूजा होऊ नये याचं दुःख कथेतील नायिकेला आहे. 'सोन्याचा गोफ' या कथेत रूक्मिणीच्या लग्नप्रसंगी वडील बापूला आपल्या जवळ जपून ठेवलेला सोन्याचा

गोफ अखेर जावयाला देऊनही तो गोफ त्याला न आवडल्याने फेकून दिला तेव्हा रूक्मिणी तो गोफ जीवापाड जपते आणि आपल्या नंदेच्या लग्नात पुन्हा तो तिच्या नवऱ्याला देते. घरात सोने असलेले गरीब माणसाच्या अडीअडचणीला उपयोगी पडते. मुळात आठवण म्हणून बापूच्या वडिलांनी त्याला आपल्या आयुष्याच्या अखेरीस आठवण म्हणून दिलेला सोन्याचा गोफ बापू आपल्या संसाराला दारिद्रयाचे कितीही चटके बसले तरी तो मोडत नाही किंवा गहाण ठेवत नाही. शिवाय तो शेटजीकडे मोलमजुरी करतो. सोन्याच्या गोफाला तो मोठ्या भक्तीभावाने जपतो. दिवाळीच्या सणाला लक्ष्मीपूजनाला तो फक्त बाहेर काढला जातो. नमस्कार केला जातो. अन् एरवी तो कायमचा पितळीच्या डबीत बंद करून ठेवला जातो. रखमी आपल्या लग्नादरम्यान सीताराम वडिलांना गोफ मागते परंतु तो तिला देत नाही. ते म्हणतात- 'रूखमा तुले कसं कयत नायी अवं आपून पळलो गरीब ! एक डाव का पावन्याइले तो गोफ दिसला का ते हातपाय पसरतीन, मंग कुठून त्याइची बरोबरी करावं ? मंग यील का नायी गोफ मोळयाचीच पायी ? अवं माया जीवात जीव हाये, तेंदलेग मी तो मोळत नायी. आन सोनं मोळून लगन करूइ नायी. अवं ! माया बाप्पूची आठोन हाये ते ! अन् साऱ्याइले मालम झालं का माया जोळ गोफ हाये, त तो रायनारच नायी.'३ पण जेव्हा तो गोफ आपल्या जावयीला रखमाच्या नवऱ्याला द्यावा लागतो तेव्हा तो न कचरता देतो. कारण उद्या म्हातारपणी तो आठवण म्हणून मुलीला व जावयाला देण्याऐवजी आता दिला याचं समाधान सीताराम वडीलाना होते. पण तोच सोन्याचा गोफ मुलगी रखमा आपल्या नंदेच्या लग्नात तिच्या नवऱ्याचा रूसवा काढण्यासाठी सिताराम बापू देखत देवून टाकते. तो देताना ती घाबरते. मनातून भीते तिला दुःख होते परंतु बापू तिची समजूत घालतात. तु तुझ्या घराचं घरपण राखलस आणि तुझ्या घराच्या अडचणीच्या वेळी गोफ उपयोगी पडला तू मोठ्या मनानं तो दिलास यात मोठेपणा आहे. तू दुःख करू नकोस. प्रस्तुत कथेत ग्रामीण माणसाला गरिबीत हालअपेष्टा संहन करत जीवन कंठावे लागते आणि एखादी मौल्यवान वस्तू ते किती जीवापाड जपतात योग्य वेळीच ती बाहेर काढतात. नेमक्या प्रसंगी एकमेकाला उपयोगी पडतात याचं चित्रण तर येथे येतेच पण सीताराम बापूच्या मनाचे हृद्य चित्रण लेखिकेने नेमकेपणाने टिपले आहे. शिवाय रखमा मनावर सासू सासऱ्याने ज्या दुःखाच्या डागण्या दिल्या त्या ती निमुटपणे सहन करते. प्रभावी प्रसंगानुरोधाने

नाट्य निर्माण करण्याचे सामर्थ्य येथे दिसते.

स्त्री दुःखाचे नाते आपल्या समाज व्यवस्थेशी विशेषतः ग्रामजीवनाशी त्या शोधतात. शिवाय कुटुंब जीवनात निर्माण होणाऱ्या साध्या घटना, प्रसंगातून त्या स्त्रीला कशाप्रकारे व्यतीतपणे जावे लागते यांचे चित्रणही त्या करतात. अलिकडच्या स्त्रीयांच्या कथातील आशय साचेबंद बनत चालला आहे. परंतु इंगोलेची कथा साचेबंद आशयात अडकत नाही त्यांच्या काही कथांत स्त्रीया केंद्रस्थानी असल्या तरी इंगोले स्वतः ते अनुभव केवळ स्त्री म्हणून घेत नाहीत. माणूस म्हणून घेतात. त्यामुळेच त्यांची कथा जीवनाची नवी नवी क्षेत्रे धुंडाळत असते. ' चाकोळी ' ही त्यांची कथा नवविवाहित स्त्रीला संसारात उतरल्यावर कोणकोणत्या परिस्थितीला सामोरे जावे लागते याचे चित्रण यात आले आहे. या कथेतील नायिका नुकतीच लग्न होऊन सासरी येते. विंचू चावतो. दुःख होते. नवरा मदत करतो परंतु सासू-नंदा टोचून बोलत असतात. परंतु नंतर आपल्या नंदेवर नलूवर तसाच बाका प्रसंग येतो तेव्हा तिची सासू आपल्या लेकीसाठी रडते. नायिकेच्या नवऱ्याला नलूच्या भावाला माहेरी आण असे सांगते तर तो विरोध करतो. आपल्या बायकोला विंचू चावला तेव्हा तुला दया आली नाही आता कशी दया आली असे आपल्या आईला टोचून बोलतो. तेव्हा ती म्हणते , 'उचकनं देतं काय, तू मले ? अरे ! इंचवाचा डंख पुरला पन. . . . पोटच्या पोराच्या बोलाचा डंख सईन नायी व्हत रे !' ४ अशी या कथेत माईची, आईची आपल्या मुलीसाठी जीवाची होणारी ओढाताण चित्रित केली आहे. स्त्री दुःखाच्या विविध कारणमिमांसाचा उहापोह करणं लेखिकेच्या लेखनाचा पिंड आहे. शिवाय त्याची कथा आशय आणि अभिव्यक्ती एक स्त्री म्हणून असलेली सचोटी खास शैलीमधून कथन ह्यामुळेही त्यांची कथा दर्जेदार बनते. वऱ्हाडी बोलीचे आणि विदर्भातील कष्टकरी ग्रामीण स्त्री-पुरूषाच्या दुःखाची किनार हा त्यांचा लेखनाचा गुणधर्म होय. आतापर्यंत मराठी ग्रामीण कथाविश्वात लेखिका प्रतिमा इंगोले यांनी महत्वपूर्ण कामगिरी केली आहे. हिरवे स्वप्न, सुगरणीचा खोपा, लेक भुईची इ. कथासंग्रह वऱ्हाडी बोलीतील आणि विदर्भातील जीवन स्थिती-गतीचे वास्तव विदारक दर्शन घडवित आहेत.

चौथ्या पिढीच्या ग्रामीण लेखकामध्ये बाबाराव मुसळे यांचे कथालेखन लक्ष वेधून घेण्यासारखे आहे. मुंसळे यांच्या अनेक कथांना कथा स्पर्धेमध्ये बक्षिसे

मिळाली आहेत. ग्रामीण जीवनातील विविध सुक्ष्मातीसूक्ष्म अनुभवाचे कथन त्यांनी आपल्या कथामधून केले आहे. ग्राम व्यवस्थेतील बदलती मूल्यधारा अभिव्यक्तीच्या प्रखर जाणीवासह मांडण्याचे सामर्थ्य त्यांना लाभले आहे. वैयक्तिक दु:खाबरोबरच सामाजिक दु:ख मुसळे यांनी प्रभावीपणे मांडले आहे. त्यांची 'मोहरलेला चंद्र' ही अतिशय परिणामकारक कथा आहे. या कथेत लेखकाने पायरूच्या जीवनातील जळजळीत दु:ख व्यक्त केले आहे. या दु:खाला जन्मापासून सुरूवात होते तर भुजंग सारख्या कथेत आपल्या जमिनीसाठी स्वत: वेड्याचे सोंग घेऊन वावरणारा पाटील वाचकाच्या मनावर फारच परिणाम करतो. या कथेत लेखकाने नाट्यात्मक प्रसंग उभा केला आहे. आपली जमीन दुसऱ्याला जाऊ नये ती आपलीच राहावी व आपल्यावरील कर्जाचा बोजाही दूर व्हावा असा दुहेरी डाव या कथेचा नायक पाटील व्यक्त करतो. माणसातील सुष्ट-दुष्ट प्रवृत्तीच्या झगड्याचे सामर्थ्य अभिव्यक्त झाले आहे. ग्रामीण कुटुंबातील कडू-गोड क्षण रंगवणे हा मुसळे यांचा पिंड आहे. हार - जित निंदा या कथा या दृष्टीने पाहण्यासारख्या आहेत. त्या उत्कृष्ट झाल्या आहेत. जुने बलुतेदारी व्यवसाय खेड्यातून जात आहेत आणि नवीन व्यवसाय येत आहेत. या दरम्यानचा हा संक्रमणाचा काळ. या काळात खेड्यातील भरडले जातात गावातील मध्यमवर्गीयाबरोबरच गावकुसाबाहेर वास्तव्य करणाराचे जीवन ही या मुळे भरडून निघते. याची जाणीवपूर्वक नोंद मुसळे यांनी आपल्या काही कथांमध्ये व्यक्त केले आहे. 'चौघडा', 'घमड्या' या दोन कथा यादृष्टीने महत्वपूर्ण आहेत.

खेड्यातील अंधश्रध्दा यावरतीही मुसळे यांनी नेमकेपणाने भाष्य केले आहे. 'दूध' ही त्यांची कथा अतिशय दर्जेदार स्वरूपाची झाली आहे. या कथेत पायाळू माणसाच्या अंगावर वीज पडते. हा धागा पकडून त्यातून योग्य वातावरण निर्मिती केली आहे. पाऊस खूप पडतो. ओढ्याला पाणी येते. पाणी ओळखायचे नसते आणि त्यातच वीज कोसळते. असे घटनाक्रम घडत जातात पण यात प्रचारात्मक भूमिका मुसळे कुठेही घेत नाहीत. हकिकतवजा रूप स्वरूप प्राप्त होत जाते. बाबारावाची कथा चौथ्या पिढीतील एक सामर्थ्यवान कथा बनत जाते. याची कारणे त्यांच्या कथाचे कथाबीज सुटसुटीत आणि एकात्म- एक पदरी असलेली बांधणी, प्रभावी आणि प्रवाही निवेदन आणि समर्थ अशा व्यक्तिरेखा. या व्यक्तिरेखा उभे करणारे बोली भाषेतील ठसकेबाज संवादही आहेत. नव्हे समग्र

लेखनाचे विशेष आहेत. त्यांच्या कथेतील सर्व छोटी-मोठी पात्रे स्वत:ची वैशिष्ट्ये बरोबर घेऊन येतात. ग्रामीण मातीतून उगवल्यासारखी वाटणारी ही माणसे कथा वाचल्यानंतरही मनात रेंगाळत राहतात. बाह्य तपशीलात अडकून न पडता बाबाराव मुसळे यांची ग्रामीण कथा ग्रामीण मनाचे पापुद्रे सूक्ष्मपणे भेदत जाते.[५] शिवाय तीव्र आणि संघर्षमय असलेल्या अनुभवावर ती आधारलेली असते. त्यामुळे तिची वीण ही नाट्यमय आणि गुंतागुंतीची असते. तरी जीवनाच्या एकूण संमिश्रतेचे चित्रण त्यांची कथा करते आहे असे वाटत राहते.

यानंतरचे कथाकार म्हणजे सदानंद देशमुख होय. सदानंद देशमुख याचा 'आधारबन' हा कथासंग्रह. या संग्रहाचा बराच बोलबाला झाला आहे. आपल्या संवेदनशील मानाने आपणाला आलेल्या अनुभवाची प्रचिती साहित्यातून घडविणे हा मूळ पिंड लेखकाचा असतो तथापि सदानंद देशमुख यांनी आपल्या कथा, कादंबऱ्यातून आपल्या समाजाची खेड्यातील वास्तव, विदारक प्रश्न उभे केले आहेत. त्याकडे लक्ष द्यायला कोणालाच वेळ नाही. त्यामुळे असे प्रश्न ऐरणीवर आणण्याचे काम साहित्यातून देशमुख यांनी केले आहे. देशमुख यांची कथा सरळ साधेपणाने साध्या घटना आणि प्रसंगातून उलगडत जाते तरीही ती मनाची पकड घेते. कारण हे सारे अनुभव लेखकाच्या मनात भिनले आहेत. त्या अनुभवाचा परिणाम असा की लेखक सच्च्या दिलाने हे सर्व वर्णन करतो. ग्रामीण जीवनातील बदलत्या वृत्ती प्रवृत्तीने लेखक अस्वस्थ होतो. त्यांनी आधारबन या कथा संग्रहाला जे निवेदन जोडले आहे ते अत्यंत बोलके आहे. ते लिहितात, "अंधारबन हा माझा पहिला कथासंग्रह म्हणजे सुख:दु:खाचा फेर धरून नाचणाऱ्या अनुभवाचे पूर्ण वर्तुळ दु:ख कधी वारूळासारखे माझ्या व्यक्तिमत्वाभोवती उगवत गेले, तर कधी सुखाची वाट हिरव्यागार शिवारातून नागमोडी वळणे घेत विरून गेली. या सर्व सोहळ्याचे रंग बांधावरचा पळस पाठीशी घेऊन मी कणाकणात भिनवून घेतले."[६] यावरून देशमुख याच्या कथाविश्वाचे व्यापक स्वरूप लक्षात येते. शिवाय त्यात विविधता विपुलता आहे. ग्रामजीवनाचे आजचे रूप त्यातील विकसनशील व विकासातील सावळा गोंधळ अराजकता आणि सरकारी कामातील अपप्रवृत्ती यांची नेमकेपणाने वेध घेतले आहे. लालफितीच्या कारभारावर दोष दाखवून त्यावर उपहासात्मक भाष्य देशमुख यांनी केले आहे. त्याची 'जतावणी' ही कथा या दृष्टीने

विशेष उल्लेखनीय आहे. या कथेत उपहासातून विनोदनिर्मिती केली आहे. शिवाय खेड्यात सरकार कामातील दिरंगाई आणि एका कामासाठी सतरा फाटे फोडणे अशा पध्दतीने टीका केली आहे. या सर्व व्यवहारात सीताराम सारख्या गरीब शेतकऱ्याची होणारी मानसिक उलघाल हा या कथेचा गाभा आहे हेही लक्षात येते.

'तिखटकुटी' ही देशमुखाची अशीच एक लक्षणीय कथा आहे. या कथेत शेवंताच्या दारिद्रयाचे दु:ख हृदयद्रावक अधिक गडदच बनत जाते. असे वाटत राहते. शिवाय या दु:खाने ही कथा वाचणाऱ्याचे हृदय पिळवटून निघते. आज ही ग्राम व्यवस्थेत जीवन जगण्यासाठी दोन वेळचे यथासांग पोट भरण्यासाठी माणसाला यातना सहन कराव्या लागतात. प्रस्थापित परिस्थितीत कितीही सुधारणा झाल्या. नवतेचं वारं वाहिलं. तरी अशिक्षित माणसांना रोजचं मरणप्राय जीणं वाट्यांला यावं याला कारण काय हा प्रश्न देशमुख आपल्या कथातून उभा करतात शेवंता ही सामान्य स्त्री. स्त्री म्हणून किती यातना सहन कराव्या याला काही अर्थ आहे का ? असा सतत वाचकाला प्रश्न पडावा इतके प्रभावी अभिव्यक्तीतून देशमुख यांनी हे कथन केले आहे. ग्रामीण समाजात शिकलेल्या पण ग्रामीण जीवनापासून फारकत घेतलेल्या आणि नोकरी नाही म्हणून कोलमडून गेलेल्या तरूण मनाचा वेध त्यांनी 'झंझावात' या कथेत घेतला आहे. आज बहुतेक करून शिक्षणाचे विकेंद्रीकरण झाल्याने ग्रामीण भागातील अनेक मुलं-मुली शिकलेली आहेत पण त्यांना शिक्षणाने ज्ञानी बनवले पण सुसंस्कारी बनवले नाही. जे शिकले - सवरले त्यांनी आपली परंपरा आपली माणसे, आपले कुटुंब आपला समाज यांच्यापासून त्याने फारकत घेतली आहे म्हणून त्याच्या जीवनात एक प्रकारचा झंझावात निर्माण होतो आहे. त्याला शिकल्याने ना नोकरी मिळते. ना काम होते आणि काम करावयास सुध्दा त्याला कमीपणाचे वाटते. या सर्वातून तो निष्काम माणूस बनतो. नको ते उद्योग करतो आणि कुटुंबात, गावात वादळ निर्माण करतो. याचे वास्तव दर्शन देशमुख यांनी आपल्या कथातून घडविले आहे. देशमुख यांची कथा ग्रामीण जीवनातील समस्याचे भान निश्चित ठेवत असते पण त्यांचा रोख हा त्यांना ग्रामातील व्यक्तीच्या मनाची उलाघाल दाखवण्यासाठीच असतो की काय असे वाटते. सामाजिक समस्यांच्या मानाने व्यक्तीच्या मनाची उलाघाल यातनूच खऱ्या अर्थाने त्यांच्या कथेची कलात्मकता अधिक वाटत राहते असे जाणवते.

ग्रामीण स्त्रीचे दु:ख आपल्या कथातून सदानंद देशमुख अतिशय हळूवारपणे रंगवतात. कुटुंबव्यवस्था आणि ग्राम जीवनातील अभावग्रस्तता यामुळे ग्राम स्त्रीचे दु:खाचे अनेक पदर सूक्ष्मपणे टिपलेले आहेत. 'आसपासचं आभाळ' 'मरणवाट उलंगवाडी ' या कथा स्त्री दु:खाची जळजळीत रूप स्पष्ट करणाऱ्या कथा आहेत. आसवाचं आभाळ या कथेतील नायिका मोठ्या जिद्दीने संसाराचा विचार करते जगण्यासाठी धडपडते परंतु आसवाचं आभाळ मात्र तिला सतत बरोबर घेऊनच वाटचाल करावी लागते. तर प्रत्येकालाच मरणवाटने प्रवास करावयाचा आहे याची जाणीव प्रत्येकालाच असते पण या वाटेवर सतत प्रवास करणारी या कथेतील नायिका मरणप्राय यातना भोगत राहते.

उलंगवाडी ही देशमुखाची कथा कुटुंब कलहात सारजेची होणारी मानसिक होरपळ मोठ्या ताकदीने रंगवतात. सारजा नवऱ्यासाठी शेतावर न्यहारी घेऊन जाताना नवऱ्यावरच्या प्रेमामुळे भाकरीवर शिक्यातले थोडे लोणी होते. एवढ्याशा साध्या प्रसंगातून त्या ग्रामीण एकत्र कुटुंबात जीवघेणा कलह उभा राहतो. सुनेला छळणे हाच धर्म मानणारी कुटुंबातील लहान मनाची माणसं यावरून सारजेवर आरोपाचं काहूर उठवतात आणि या कलहाचा शेवट सारजेला कायमचं माहेरी सोडून येण्यासाठी बैलगाडीत बसवण्यामध्ये होतो. कथेच्या प्रारंभापासून अखेरपर्यंत एक प्रकारचे नाट्यात्मक रूप साकार झाल्याची जाणीव होते. या कथेत कोठेही अतिरंजित स्वरूप प्रकट न करता जे घडते आहे ते सरळ निवेदनात्मक साध्या पध्दतीने कथन येथे केले आहे. कोठेही चीड नाही, राग नाही की, आक्रस्ताळेपणा नाही. सदानंद देशमुख यांच्या कथांचा एकत्रित विचार केल्यानंतर आपणास असे जाणवते की, आशयानुसार अभिव्यक्ती आणि आटोपशिरपणा आणि उत्कटता यामुळे त्यांच्या सर्वच कथा काव्यात्मक बनतात. शिवाय निवेदनासाठी प्रमाणभाषा आणि संवादासाठी ग्रामीण बोली यांचा सुरेख तोल सांभाळला आहे. त्यांनी शहर विरूध्द ग्रामीण सुष्ट विरूध्द दुष्ट अशी कोणत्याही स्वरूपाची द्वंद्वे उभी केली नाहीत. जीवन जसे आहे तसे त्यातील वास्तव मांडण्याचा प्रयत्न केला आहे. देशमुख आज ग्रामीण कथा लिहित आहेत त्यांच्या कथातून ग्रामीण वास्तवतेचे नेमके स्वरूप सूक्ष्मातिसूक्ष्म ताण्याबाण्यासहित चित्रित होईल यात शंका नाही.

आजच्या काळात आनंदराव पाटील यांच्या कथारूपाचा विचार

प्रामुख्याने करताना त्यांचा 'चलघुल,' 'खिल्लारी जोडी' हे दोन कथासंग्रह प्रकाशित आहेत. ग्रामीण जीवनाचे वेगवेगळे पदर त्यांनी आपल्या कथामधून अभिव्यक्त केले आहेत. त्यांच्या कथेचे स्वरूप कहाणीवजा आहे. ग्राम खेड्यात कुटुंबात घडणाऱ्या घटना साधेसुधे प्रसंग त्यावर त्यांनी आपली कथा उभी केली आहे. त्याचे रूपही किस्सेवजा आहे. लेखकाचा हेतूच असा की, साहित्याने येथे मनोरंजन केले पाहिजे. त्यामुळे त्यांच्या कथा मनोरंजनाच्या पातळीवरच राहतात. ग्रामीण खेडूत माणूस त्याच्या कथेत चेष्टेचा विषय झाला आहे असे वाटते. शिवाय पूर्व ग्रामीण लेखकातील किस्सेवजा लेखनाची री पाटील यांनी ओढली आहे असे वाटते. कुटुंब कहाणीत रोजच्या ताण-तणावाचे चित्र भावनिक अभिव्यक्ती व वास्तव दर्शन त्यांच्या 'म्हाताऱ्याची वाटणी' सारख्या कथेत स्पष्ट होते.

**आप्पासाहेब खोत यांच्या कथेचे पृथकत्व :-**

आप्पासाहेब खोत यांच्या कथाविश्वाचा विचार करताना एक साहित्यिक जाण असणारा ग्रामीण कथालेखक म्हणून ते आज लिहित आहेत. असे त्यांचे वाङमय वाचताना जाणवते. समकालीन ज्या लेखकापेक्षा आप्पासाहेबांचा लेखनाचा पिंड खूपच वेगळा आहे असे काही ठिकाणी निश्चितपणे कथा वाचताना वाटते. समग्र ग्रामीण खेड्यातील माणसांची वृत्ती, प्रवृत्ती अभिव्यक्त करण्यात खोत आघाडीवर आहेत. कोल्हापूर जिल्ह्यातील पन्हाळ्याच्या पायथ्याशी वास्तव्य करणारा हा लेखक आपल्या परिसरातील अनेकविध घटना, घडामोडीचा आलेख समर्थपणे आपल्या कथेतून चित्रित करतो आहे. साहित्याने सामाजिक बांधिलकी मानावी आणि समाज आणि साहित्य यांच्या अन्योन्य संबंध मानणारा हा लेखक प्रबोधनाच्या अंगाने आपले लेखन करत जातो. पण प्रबोधन करणे हेच केवळ त्याचे प्रयोजन नाही तर कलात्मक उंची गाठणे आणि वाचकाला आनंद प्राप्त करून देणे हेही ते साध्य करतात. इतर ग्रामीण लेखकानी आतापर्यंत विविध अंगाने लेखन केले आहे. त्यात सामाजिक बांधिलकी मानून काहींनी लेखन केले तर काहीनी कलात्मक प्रत्ययाच्या अंगाने लिहिले आहे. ग्रामीण साहित्यात केवळ आपआपल्या ग्रामीण व्यवस्थेतील एक पदर उलगडून दाखवण्याचे काम आजवर झाल्याचे दिसते. त्यात गावगाडा, त्यातील माणसे, त्यांच्या अनेक तऱ्हा, जातीनिहाय समाजगट, त्यातील ताण-तणाव, सलोखा, हेवेदावे, श्रध्दा - अंधश्रध्दा यातील एक- एक नस लेखकानी पकडून

त्याला शब्दरूप दिले. आहे. त्यात समाज वास्तव, सामाजिक बांधिलकी मानणारा लेखकवर्ग श्री. म. माटे पासून ते माडगुळकर, शंकर पाटील, आनंद यादव, प्रतिमा इंगोले, मुसळे, सदानंद देशमुख, आप्पासाहेब खोत असा होतो तर इतर रंजनवादी केवळ ठोकताळे देऊन ग्रामीण चित्रण करण्याचा घाट दिघे, ठोकळ, मिरासदार, रंगराव बापू, व बा. बोधे, आनंदराव पाटील इ. लेखकांनी घातला आहे.

**१) अभिव्यक्तीचे सामर्थ्य :-** ग्रामीण साहित्य ग्रामीण वास्तवाचा विचार करणारे साहित्य आहे. त्याचबरोबर ग्रामीण माणसाला ते केंद्रभूत मानते आणि आपल्याच गावगाड्याच्या वर्तुळ परिघात ते सतत फिरत राहते. कालक्रमनानुसार त्यात सतत बदल होत राहतो. याची समग्र जाणीव चौथ्या पिढीतील लेखकाना आहे. परंतु ग्रामीण माणसाच्या बदलत्या प्रवृत्ती नेमकेपणाने अभिव्यक्त करण्याचे सामर्थ्य फक्त काही लेखकांनाच आहे. त्यातल्या त्यात इंगोले , मुसळे , देशमुख आणि खोत हे होय. तथापि आप्पासाहेब खोत यांनी आपल्या कथांचा स्वतंत्र पिंड पोसला आहे. ग्रामीण माणसाच्या व्यथा, वेदना आणि त्यांच्या मानसिक तणावाचा आलेख जणू खोत यांनी आपल्या सर्वच कथातून अभिव्यक्त केला आहे. आपल्या कथेची वीण इतराप्रमाणे न अभिव्यक्त करता त्याची मांडणी वेगळ्या धाटणीने करतात.

**२) संवादात्मक - निवेदनशैली :-** आजपर्यंत मराठी कथेत अभावाने जाणवेल अशी कथेची निवेदनशैली संवादात्मक रूपाची हे खोतांच्या कथेच्या वेगळेपणाचे महत्वाचे कारण आहे. त्यांच्या प्रत्येक कथेची सुरूवात संवादातून होते आणि पुढे ती कथा आपला आशय एक सरळ पठडीत उभा करीत जाते आणि शेवटी तिला एकच एक विचार देण्याचे रूप लाभते. त्याची कथा सहज आहे. सरळ आहे. नेमका परिणाम साधण्याचे सामर्थ्य तिला लाभले आहे. ते त्या संवादात्मक निवेदनशैलीने !

**३) खोत यांच्या कथांचे कथाबीज :-** कथेचे बीज इतर कथा लेखका-बरोबरचेच आहे परंतु त्यात बारकाव्यानिशी खोत जीवनातील एकाच कंगोऱ्यावर समग्रतेने प्रकाश टाकतात. त्यामुळे ही ती परिणामकारक होते. कथेतील आशयाबरोबरच अभिव्यक्तीच्या अंगाने ही कथा बहरत जाते. कथानक व्यक्तिरेखाटन निवेदनशैली, भाषाशैली आणि वातावरण निर्मिती याबाबत आजच्या ग्रामीण कथालेखकामध्ये

आप्पासाहेबांची कथा निश्चितच उठून दिसते यात वाद नाही. त्यांच्या समग्र कथाविश्वाचा विचार करताना त्यांनी आतापर्यंत चार कथासंग्रह वाचकांच्या पुढे ठेवले आहेत. त्यातील कथातून पन्हाळा जाखले परिसराचा तिथल्या स्थिती गतीचा आणि वृत्ती-प्रवृत्तीचा बदलत्या जाणिवांचा जणू पटच त्यांनी येथे उलगडून दाखविला आहे. 'गवनेर' , 'महापूर' , 'रानगंगा', 'कळवंड' हे कथासंग्रह ! वाचनीय झाले आहेत.

**४) व्यक्तिचित्रण : –** खोत यांच्या कथेचे मध्यवर्ती केंद्र हा माणूस आहे. त्या माणसाच्या सर्व जाणिवा, व्यथा , वेदना , सुख-दु:ख यासह त्यांच्या अंर्तमनाचा गाभा शोधण्याचा प्रामाणिक प्रयत्न त्यांनी केला आहे. त्यांच्या कथेत प्रामुख्याने स्त्री- पुरुष अंर्तमनाचा वेध नेमकेपणाने घेत बदलत्या सामाजिक सांस्कृतिक राजकिय जीवनाचा स्वीकार करण्यास त्या कशा सक्षम आहेत हे तर दिसतेच पण त्याचबरोबर प्रस्थापित व्यवस्थेत आपले अस्तित्व टिकवण्यासाठी त्याची चाललेली धडपडही येथे दिसते. त्यांच्या लेखनाचे वेगळेपण माणूस चित्रित करण्यात आहे. परिस्थितीचा माणसावर होणारा प्रभाव आणि त्यातून बदलत जाणारी त्याची वृत्ती याचा सुरेख सुमेळ त्यांनी घातला आहे. त्यांची 'दसऱ्याची कडाकणी ' , 'पान्हा,' 'तोड', 'उध्वस्त' या कथा वाचण्यासारख्या आहेत. शिकलेला वसंत आईला - समाजाला विसरतो. 'दसऱ्याची कडाकणी ' एक शिकलेला, इंजिनियर झालेला, पुरोगामी विचाराचा, तरूण, स्त्री मुक्ती, हुंडा विरोधी आणि समाज प्रबोधन या विचारानं भारलेला तरूण आपल्या पत्नीला ' तू मुलाला बाळाला पाजू नकोस. तुझं सौंदर्य नष्ट होईल त्याला वरचं दूध सुरू कर असा दम भरतो.' 'पान्हा' अडाणी अशिक्षित आकू आपल्या घराण्यातील परंपरेला छेद देऊन आपल्या सुनेचा दुसरा विवाह करते. 'तोड' एक प्रामाणिक मुलाची शिकूनही चांगले मार्कस् असून वशील्याअभावी कशी गळचेपी होते आणि त्याने पाहिलेल्या स्वप्नांचा फज्जा कसा उडतो तो आत्महत्येसारख्या प्रवृत्तीकडे ओढला जातो. स्वत: उध्वस्त होवू पाहतो. 'उध्वस्त'

**दु:ख, व्यथा, वेदना स्पष्ट :–** खोत यांच्या कथेत दु:ख, व्यथा, वेदना, प्रभावीपणे स्पष्ट झाल्या आहेत. 'जोजकार ' ही कथा खोत यांनी मोठ्या जाणिवेनिशी लिहिलेली कथा आहे. या कथेत वृध्द ज्ञानू तात्या यांची करूण कहाणी मांडली

आहे. खोत यांच्या कथेत दु:ख हे माणसाच्या परिस्थितीबरोबरच असते. ते कालानुरूप बदलत असते. ते माणसाचं स्थायीत्व होवून राहते. त्याला सामोरे जाणारी माणसेच आप्पानी आपल्या कथातून समर्थपणे उभी केली आहेत. 'महापूर' या कथा संग्रहातील जवळजवळ सर्वच कथा दु:ख, व्यथा वेदना स्पष्ट करणाऱ्या आहेत. त्यातील 'महापूर' शिर्षकीय कथा 'जोसरा', 'तोडगा', 'पाटाचं पाणी.' 'पाण्याविना मासोळी ' 'नात्यानं बाप' 'ऊन सावली' हिरा नावाच्या विधवेची करूण व्यथा आणि अखेर पुरातून वाहून जाणे याचं हृदयस्पर्शी चित्रण ' महापूर '! भीमा पैलवान बायकोसाठी वेडा होतो. त्याला त्याचेच आई बाप कारण झालेले असतात. एक वेगळ्याच विषयातून ग्रामजीवनातील पारंपारिक समजातून जी विघातक प्रवृत्ती जन्म घेते त्याचे प्रत्यंतर यात येते. भीमाची दु:खमय कहाणी खोतानी आपल्या शैलीने नेमकेपणाने अभिव्यक्त केली आहे. 'जोसरा'.! हौसा या विधवा स्त्रिने आपल्या लेकीसाठी रात्रंदिवस राबराब राबून तळहाताच्या फोडाप्रमाणे तिला जपले. तिचे लग्न करून दिले. फुला नांदाय जाते पण तिच्या जीवनाची शोकांतिका होते. तिला जीवघेण्या त्रासाला सामोरे जावे लागते. अखेर फुला त्यांवर तोडगा काढते. सासू - नवऱ्याला मारहाण करते. आईने बरोबर दिलेले साहित्य बरोबर घेते आणि माहेरी येते. दोन्ही मायलेकीच्या दु:खाचा आलेखच खोत यांनी यात मांडलेला आहे. वास्तविक खोत यांच्या कथेत स्त्री-पुरूषाची म्हणून वेगवेगळ्या तऱ्हेची दु:ख त्याची कारणही वेगवेगळी. काही समाजव्यवस्थेने तर काही पूर्वपरंपरा, श्रध्दा - अंधश्रध्दा मानण्यातून तर काही वेळा माणसाने माणसांना निर्माण करून ठेवलेला अडथळ्यातून निर्माण झालेली या कथातून अभिव्यक्त केली आहेत.

**६) ग्रामीण स्त्रीचे अनोखे दर्शन :-** चौथ्या पिढीतील ग्रामीण लेखकाच्यामध्ये आप्पासाहेब खोत यांचे वेगळेपण ग्रामीण स्त्रीचे अनोखे दर्शन यातून घडते. त्यांनी ग्रामीण स्त्रीचं त्यातल्या त्यात विधवा स्त्रीचं जळजळीत दु:ख तिचे म्हणून असणारे अनेक प्रश्न खोत यांनी आपल्या कथातून प्रभावीपणे मांडले आहेत. आजपर्यंत मराठी ग्रामीण कथाविश्वात विधवा स्त्रीचे चित्रण अपवादात्मकच रितीने आले असेल. तथापि खोत यांच्या बहुतेक कथा विधवा स्त्रीच्या समस्या, तिचे दु:ख, तिचे म्हणून समाजात असणारे स्थान यावरही नेमकेपणाने भाष्य केले आहे. 'दसऱ्याची कडाकणी' मधील गिरजा 'महापूर' मधील हिरा 'ऐपत' मधील कमळा,

'तोडगा' मधील हौसा 'पाण्याविना मासोळी' मधील मंजुळा 'तोड' मधील आकू 'कोंडमारा' मधील हौसाबाई या सर्व स्त्रियांची जगण्यासाठी जिद्दीने ताठ मनेने चाललेली धडपड आणि आजच्या समाज व्यवस्थेतील विघातक प्रवृत्तीने त्यांची केलेली कोंडी याचे वास्तव दिग्दर्शन खोत करतात. आजवर असे चित्रण ग्रामीण कथेत अभावानेच पहायला मिळते. तथापि खोत यांनी मोठ्या सामर्थ्यानिशी त्यांच्या दु:खाचे पदर उलगडून वाचकांना अंतर्मुख केले आहे. वाचकांच्या मनावर खोलवर परिणाम करून जाणारी 'महापूर' कथा त्यातील हिरा स्त्री आपल्या मुलासह भरल्या पुरातून वाहून जात असते. त्याचे चित्रण साक्षात लेखकाने हृदयस्पर्शी केले आहे. 'कमळा' ही 'ऐपत' नसतानाही आपल्या मुलीसाठी आयुष्यभर कष्ट उपसते. 'तोड' मधील आकू आपल्या विधवा सुनेच्या दुसऱ्या लग्नाचा विचार करते.'तोडगा' मधील हौसा आपल्या मुलीसाठी आयास -सायास करून चांगल्या प्रकारे तिचे लग्न करून देते. स्वत: कष्ट हाल सोसते. परंतु मुलीचे जे व्हायचे ते होते. मुलगी फुला नवऱ्याला सासरला टाकून माहेरीच राहायला येते. मुलीच्या भरल्या संसाराची स्वप्न बाळगलेल्या हौसाच्या स्वप्नांचा अखेर चक्काचूर होतो. 'पाण्याविना मासोळी ' मधील मंजुळा आपल्याला दिलेल्या शब्द पाळून माधव परत येईल अशा आशेवर ती जगत राहते. तथापि तो सैन्यातून परत न येता लढाईत कामी येतो. आणि मंजुळेच्या आयुष्याला उभा छेद जातो 'कोंडमारा' मधील हौसाबाई आपल्या सुनेच्या काळजीने हवालदिल झालेली असते. त्यासाठी ती आकांत मांडते. आपल्या मुलाला सुनेला दवाखान्यात नेण्यास प्रचंड विरोध करते.

**७. विषय वैविध्य :** विषयाचे वैविध्य हा खोत यांच्या लेखनाचा वेगळा असा पिंड आहे. बदलत्या ग्रामीण व्यवस्थेत बदलतं वारं त्याबरोबर बदलती माणसं. याचं चित्रण समर्थपणे येतेच पण दुष्काळसारख्या स्थितीत माणूस कसा माणुसकी सोडून वागतो यांचे दर्शन त्यांनी 'परवड' या कथेत केले आहे. एका निरागस बालिकेला चिमीला या माणूसशून्य समाजात रामा आणि सीताला कसे मुकावे लागते याचे हृदयद्रावक चित्रण येथे आले आहे. 'लेकावळा' ही आज प्रस्थापित व्यवस्थेत जातीचा असूनही जातीच्या बाहेर कसा ठेवला जातो याचे चित्रण यात आहे. पहिल्या पिढीनं लग्नाशिवाय संसार केलेला. मुलं - बाळं झालेली पण तिसऱ्या पिढीपर्यंत या मुलांना लग्नं होताना किती अडचणी येतात यावर प्रकाश टाकला आहे.



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

आई - वडिलांची वाटणी आणि ताटातूट करणारी पिढी आज निर्माण होते आहे याची जाणीव करून देणारी 'वाटणी' ही कथा ग्रामीण कथेतील वेगळ्या विषयावरची कथा आहे. 'ऊन सावली' व्यसनाधिनतेने संसाराची होरपळ तर होतेच पण माणसातला माणूस संपवते असा आशय प्रकट होतो. 'भोग' देवदासीची जाणीव करून देणारी मानवी नाते संबंधावर त्यातील फोलपणावर त्या नात्यातील कृत्रिमतेवर लेखक खोत यांनी वेगवेगळ्या जाणीवेने भाष्य केले आहे. समकालीन कथालेखकाच्यापेक्षा आप्पासाहेबाचा विषय हाताळण्याचा पिंड यामुळेच वेगळा आहे. घर आणि बंगला, नात्यानं बाप, पाटाचं पाणी, वाट, गुतापा, घात या कथा या दृष्टीने पहाण्यासारख्या आहेत.

**८) मानवी नात्यातील फोलपणा :-** 'घर आणि बंगला' यातील अडाणी भाऊ शिवराम आणिं शांता, शिकलेला आनंद व त्याची पत्नी यांच्या संबंधाने लेखकाने भावा भावातील दिर - भावजय नात्यातील कृत्रिमता स्पष्ट केली आहे. जन्म देणारा म्हणूनच फक्त बाप! मुलानी महिन्याला शंभर रूपये दिले की बस, एवढ्यापुरतं नातं असणारा हा बाप! 'नात्यानं बाप!' कथेत रंगविला आहे. बाप आणि मुलं यांच्या नात्यावर लेखक खोत यांनी वास्तव दृष्टीने प्रकाश टाकला आहे. बदलत्या प्रवाहात आई-बापाना सांभाळण्याचं कर्तव्य मुले विसरत निघाली आहेत याची जाणीव ही कथा करून देते. 'पाटाचं पाणी' या कथेत नवरा बायको यांच्या नात्यात असलेला फोलपणा स्पष्ट होतो. तात्या देसाई आणि बायजा - बायजा घर सोडते. रहिम बरोबर राहते. मुलगी होते. पण पुन्हा मुलीच्या लग्नासाठी - मुलीला पुढील चांगलं आयुष्य देण्यासाठी बायजा तात्या देसाईच्या जवळ ती मुलीसह राहायला येते. तात्याही बायजासाठी नाही तर केवळ शालन या मुलासाठी तिचा स्वीकार करतो. वडील मुलीचं नातं हे एक कृत्रिम नातं लेखकाने अभिव्यक्त केले आहे. 'वाट' या कथेतील बहिण भाऊ आणि भावजय यांच्या नातेसंबंधावर प्रकाश टाकला आहे. बहिण - भाऊ हे अतूट नातं असले तरी भावजय त्या नात्यात अंतर निर्माण करते याचे चित्रण येथे प्रकट झाले आहे. 'गुतापा' या कथेत मानवी मनातील पशूवृत्ती अभिव्यक्त झाली आहे. 'घात' मध्ये वडील-मुलगा-सून यांच्या अंतर संबंधातून एकमेकाचा कसा घात करतात याचे चित्रण आले आहे.

आप्पासाहेब खोत हे समकालीन कथा लेखकाच्यापेक्षा वेगळा

आविष्कार जाणीवपूर्वक करतात. त्यातील कथाबीज अनेकविध रूप प्रकटत राहते. त्याच्या व्यक्ती ह्या ग्राम व्यवस्थेतील प्रातिनिधीक स्वरूपाच्या आहेत. त्या व्यक्ती वाचकांच्या मनात खोलवर परिणाम व्यक्त करून जातात. शिवाय त्यांची कथेतील वातावरण निर्मितीची प्रक्रिया ही सहज ओघवती अशा स्वरूपाची आहे. त्यात कृत्रिम बाज ते अजिबात आणत नाहीत. व्यक्ती आणि परिस्थिती व्यक्ती आणि व्यक्ती व्यक्ती आणि बदलता काळ यांच्या संघर्षरूप घेऊ खोत यांची कथा उभी रहते. ती वाचनीय झाली आहे.

**९) बदलत्या काळाच्या खाणाखुणा :–** समकालीन लेखकांमध्ये आप्पासाहेबांच्या लेखनाचे वेगळेपण मांडताना त्यांनी बदलत्या काळाच्या खाणाखुणा अत्यंत परिणामकारक रितीने मांडल्या आहेत. बाह्य परिस्थिती बदलली. भौतिक सुखवस्तू चैन यांचा सुळसुळाट झाला. जिकडे तिकडे बदलाचे संकेत होऊ लागले त्यामुळे माणूस ही त्यात बदलत राहिला. तो इतका बदलला की त्याच्या मनामनात असलेल्या नात्यासंबंधीच्या चौकटी पूर्णपणे मोडल्या गेल्या. कोण कोणाचा राहिला नाही जो तो आपआपल्या पायापुरते वहान पाहतो अशी स्थिती गती समाज वास्तवात पाहावयास मिळते. त्याचे प्रत्यंतर खोत यांनी अनेक कथातून केले आहे. 'गोषा', 'घर' आणि बंगला 'नाचारगत' या कथा.या दृष्टीने पाहण्यासारख्या आहेत.

खोत यांनी माणूस माणुसकी विसरत चालला आहे. प्रेम, जिव्हाळा नाती, गोती हे सर्व संपत चालले आहे. याचे वास्तव दर्शन आपल्या कथातून केले आहे. निसर्ग आणि माणूस याचं असणारं अतूट नातं काळाच्या ओघात संपत आलं आहे. याची जाणीव त्यांची कथा वाचताना होते. खोताच्या ग्रामीण कथेत गतजीवन येते. त्याबरोबर आजच्या खेड्याचेही जीवन येते. ग्रामीण बोली आणि नागरभाषा याचा सुरेख सुमेळ त्यांनी साधला आहे. ग्रामीण मनाचे अनेक पापुद्रे मनामनाचे संबंध त्या अनुषंगाने निर्माण होणाऱ्या भावना संवेदना विचार आंदोलने नेमकेपणाने टिपले आहे. जसा आत्म प्रत्यय आला त्यानुसार अनुभव प्रकट केला गेला आहे असे वाटते. बदलत्या कृषी संस्कृतीचं वास्तववादी दर्शन त्यांच्या कथामधून येते. ग्रामीण कथेतून नवा माणूस घडविण्याचा माणुसकी जपण्याचा मानवी मनाचा शोध घेण्याचा आणि त्यातून समाज प्रबोधन करण्याचा प्रयत्न त्यांची कथा करते. गवनेर या कथासंग्रहातील जवळ जवळ सर्वच कथा ह्या माणूस माती आणि प्राणी याचं

नातं सांगणारी त्याची कथा :. पुढे 'महापूर' या कथासंग्रहात ग्रामीण जीवनातील दुःखद वेदना मणसाच्या मना-मनात कशा सलगत राहतात याचे चित्रण बहुतेक कथातून आले आहे. शिवाय आजचे खेडे त्या खेड्यातील शेती शेताशी संबंधित व्यवसाय त्यात होणारे परिवर्तन यांची नोंद ही येते. ग्रामीण अडाणीपणा आडमुठेपणा श्रध्दा अंधश्रध्दा यावरतीही लेखकानं प्रकाश टाकला आहे. भाऊबंदकी बदलत्या मानसिक वृत्ती प्रवृत्ती एकूणच काय ग्रामजीवन ग्रामसंस्कृती आणि तेथील समाज विघातक प्रवृत्तीवर प्रकाश टाकण्याचं काम खोताची कथा करते आहे. समकालीन लेखकामध्ये विपुल लेखन करणारा सर्व व्यथा वेदनासह जाणीवेच्या पातळीवर मांडणी करणारा अनेक भावकंगोरे अभिव्यक्त करून वाचकाला अंर्तमुख बनविणारा लेखक खोत यांच्या कथेने मराठी ग्रामीण कथेत मोठे योगदान दिले आहे. ते परंपरेला छेद न देता नवतेचा स्वीकार करणं आणि नवतेचा स्वीकार करताना मुळातला माणूस हरवू न देता त्याला ताठ मानेने उभा करण्यास समर्थ करणे या अंगाने त्यांनी कथेचा आशय विषय आविष्कार आकारला आणला. तो आज ग्रामीण कथेत यशस्वी झाला असे म्हणावेच लागेल. आशयात आविष्कार की आविष्कारात आशय इतकी एकरूपता अभावानेच चौथ्या पिढीतील ग्रामीण कथा लेखकामध्ये जाणवते. ती खोताच्या कथेत सहज आपणास लक्षात येते. हे या कथेचे खास वैशिष्ठ्य आहे.

## निष्कर्ष

१) आप्पासाहेब खोत यांच्या कथेचे पृथकत्व समकालीन कथा लेखक बाबाराव मुसळे , प्रतिमा इंगोले, सदानंद देशमुख, आनंदराव पाटील, नामदेव माळी यांच्यापेक्षा आशय विषय आणि अभिव्यक्ती या बाबतीत काहीशी निश्चित वेगळी आहे.

२) आप्पासाहेब खोत यांची ग्रामीण कथा व्यक्तीप्रधान ग्रामीण कथा आहे. ग्रामीण माणसांच्या सर्व जाणिवा व्यथा, वेदना, सुख-दुःख यासह त्यांच्या अंर्तमनाचा गाभा शोधण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे.

३) ग्रामीण विधवा स्त्रीचं जीवघेणं दुःख चित्रित करणं हा त्यांच्या लेखनाचा खास वेगळेपणा आहे.

४) विषय वैविध्य हा लेखक खोत यांचा खास विशेष म्हणून नोंद करावा

लागतो. चौथ्या पिढीत अभावानेच विषयाचे वैविध्य इतरांच्या लेखनामध्ये आढळेल तथापि खोत यांनी व्यसनाधिनता एड्स, ऊसतोड कामगार - मालक व्यथा, विधवा विवाह असे कितीतरी विषय हाताळले आहेत.

५) मानवी नाती त्यातील अंत: संबंधावर लेखक भाष्य करतो आहे. शिवाय मानवी नात्यातील फोलपणा दाखवून देतो आहे. 'नात्यानं बाप', 'घर आणि बंगला', 'पाटाचं पाणी' या कथा पाहण्यासारख्या आहेत.

६) त्यांच्या कथेतील वातावरण निर्मितीची प्रक्रिया ही सहज ओघवती अशा स्वरूपाची आहे. त्यात कृत्रिमतेचा बाज अभावानेच जाणवेल.

७) व्यक्ती आणि परिस्थिती, व्यक्ती आणि व्यक्ती, व्यक्ती आणि बदलता काळ व्यक्तीच्या दोन मनातील द्वंद्व याचे संघर्ष रूप घेऊन खोत यांची कथा उभी राहते.

८) बदलत्या काळाच्या खाणाखुणा लेखक खोत यांनी परिणामकारणरित्या चित्रित केल्या आहेत.

९) ग्रामीण कथेतून नवा माणूस घडविण्याचा माणुसकी जपण्याचा मानवी मनाचा शोध घेण्याचा आणि त्यातून समाज प्रबोधन करण्याचा प्रयत्न त्यांची कथा करते.

१०) ग्रामीण जीवन ग्राम संस्कृती आणि तेथील समाज विघातक प्रवृत्तीवर प्रकाश टाकण्याचं काम खोताची कथा करते यात वाद नाही.

११) समकालीन लेखकात आंप्पासाहेबांच्या लेखनाचा विशेष म्हणून विषय वैविध्य म्हणून तर आहेच पण त्यांचे विपुल लेखनाने ही आज ग्रामीण कथा विश्वात भर घातली आहे.

११) परंपरेला छेद न देता नवतेचा स्वीकार करणं आणि नवतेचा स्वीकार करताना त्यातून मुळातला माणूस हरवू न देता त्याला ताठ मानेने उभा करण्यास समर्थ करं त्या अंगाने त्यांनी कथेची आशय, विषय, आणि आविष्कार अभिव्यक्त केला आहे. तो आज ग्रामीण कथेत यशस्वी झाला असे म्हणावे लागेल.

१२) आशयात आविंष्कार की आविष्कारात आशय इतकी एकरूपता अभावानेच चौथ्या पिढीतील ग्रामीण कथा लेखकामध्ये जाणवते. ती खोताच्या कथेत

सहज आपणास प्रत्ययाला येते.

१३) ग्रामीण भाषा आणि नागरभाषा यांचा सुरेख सुमेळ त्यांनी आपल्या कथा उभारणीत केला आहे.

१४) संवादमय शैली हा आप्पासाहेब खोत यांच्या लेखनशैलीचा खास वेगळेपणा त्यांची संपूर्ण कथाच संवादातून साकार होते. हा ग्रामीण कथा साहित्यात अभावानेच पहायला मिळेल पण खोतानी बहुतेक कथा लेखन संवादमय शैलीतून साकार केले आहे.

## संदर्भ टीपा


१) आभाळ दानी : नामदेव माळी : विवेक प्रकाशन वारणानगर : प्रथम आवृत्ती : पृ. २४-२५

२) अकसिदीचे दाने : प्रतिमा इंगोले : मराठवाडा पब्लिशिंग हाऊस औरंगाबाद : प्रथमावृत्ती : १९८६ : पृ. १४

३) उणी

४) तत्रैव : पृ. ५०

५) मराठी कथेची स्थिती गती : अंजली सोमण : प्रतिमा प्रकाशन : पुणे प्रथमावृत्ती : १९९५ : पृ. १८९

६) उणी


***